दैनिक
# व्याघ्र शौर्यम
उशीरा दिलेला न्याय हा अन्यायासारखाच असतो.
epaper.vyaghrashuryam.com vyaghrashuryam.com vyaghrashuryam@gmail.com
जळगाव ▪ वर्ष - ०२ ▪ अंक - २२ ▪ सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ Reg. No.MHMAR/25/A2382 ▪ पाने - 8 ▪ किंमत रु.2

# चेंगराचेंगरी प्रकरणात आयोजकांसह ७ जणांना अटक

## कोलकाता दुर्गापूजा सोहळा : घोषणेमुळे गर्दी उसळल्याचा दावा

**कोलकाता ।** पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे चोरबागान दुर्गापूजा मंडपात झालेल्या चेंगराचेंगरीप्रकरणी पोलिसांनी आयोजकांसह ७ जणांना अटक केली आहे. शनिवारी संध्याकाळी घडलेल्या या दुर्घटनेत १९ जणांचा मृत्यू झाला असून अनेक भाविक जखमी झाले आहेत. या घटनेनंतर मंडपातील गर्दी नियंत्रण आणि सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

दुर्गापूजा उत्सवाच्या सप्तमीच्या दिवशी, म्हणजेच शनिवारी सायंकाळी सुमारे ७:४० वाजता चोरबागान दुर्गापूजा मंडपात चेंगराचेंगरी झाली. या ठिकाणी मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी आले होते. या प्रकरणी दुर्गापूजा समितीचे सचिव राज कुमार सेवड आणि उपाध्यक्ष शांतनु दुबे यांच्यासह बांबूची रचना उभारण्याचे काम करणारे बिप्लब मुखर्जी यांना अटक करण्यात आली आहे. तसेच गर्दी नियंत्रणाची



जबाबदारी असलेले कौशिक साहा आणि पिंटू डे, तर खासगी सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित सुमन चक्रवर्ती आणि राजेश पाल यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे. पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी प्राथमिक अहवालाचा हवाला देत आयोजकांनी लाऊडस्पीकरवर केलेल्या घोषणेमुळे भाविकांची गर्दी वाढल्याचे सांगितले. कोलकाता मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात जखमींची भेट घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मंडपात नेमकी कोणती घोषणा करण्यात आली होती, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, दोन मृतांच्या कुटुंबीयांनी खासगी सुरक्षा रक्षकांनी शिट्ट्या वाजवल्यामुळे भाविकांमध्ये गोंधळ निर्माण झाल्याचा दावा केल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी थीमवर आधारित दुर्गापूजा मंडपांच्या आयोजकांना योग्य प्रकाशव्यवस्था आणि भाविकांच्या येण्या-जाण्यासाठी पुरेशी प्रवेशद्वारे ठेवण्याचे आवाहन केले. उत्सवाच्या सजावटीपेक्षा लोकांचे प्राण अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. चेंगराचेंगरीच्या घटनास्थळाची तपासणी करण्यासाठी न्यायवैद्यक विभाग, पोलीस एसटीएफ आणि अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले आहे. दुर्घटनेचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे.

### अमित शाहांचे कार्यक्रम पुढे ढकलले!

या दुर्घटनेनंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह संबंधित शासकीय कार्यक्रम पुढे ढकलण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शाह शनिवारी संध्याकाळी कोलकाता येथे दाखल झाले होते. रविवारी त्यांचा काही दुर्गापूजा मंडपांना भेट देण्याचा कार्यक्रम होता. या घटनेमुळे दुर्गापूजा उत्सवादरम्यान गर्दीचे नियोजन, सुरक्षा व्यवस्था आणि आपत्कालीन उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

# भरधाव कारची पोलिसांसह भाविकांना जोरदार धडक

## भीषण अपघात : पोलीस उपनिरीक्षकांचा जागीच मृत्यू

**नाशिक ।** जिल्ह्यातील सप्तशृंगगडाच्या पायथ्याशी असलेल्या नांदुरी येथे रविवारी मध्यरात्री भीषण अपघात घडला. भरधाव कारने रस्त्यावरून जाणाऱ्या भाविकांना आणि बंदोबस्तावर तैनात असलेल्या पोलिसांना धडक दिल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्घटनेत वाहतूक शाखेतील एका पोलीस उपनिरीक्षकांचा मृत्यू झाला असून ११ हून अधिक भाविक आणि पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नांदुरी येथील मुख्य रस्त्यावर रात्री सुमारे २ वाजण्याच्या



सुमारास हा अपघात झाला. सप्तशृंगगडाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांची या परिसरात वर्दळ होती. त्याचवेळी भरधाव वेगाने आलेल्या कारने भाविक आणि बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलिसांना धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की कारच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. या अपघातात वाहतूक शाखेतील पोलीस उपनिरीक्षकांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यांच्या मृत्यूमुळे पोलीस दलात हळहळ व्यक्त होत आहे. अपघात घडल्यानंतर कारचालक घटनास्थळावरून पळून गेल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. या घटनेमुळे नांदुरी परिसरात खळबळ उडाली.

# केतन अग्रवाल हत्या प्रकरणी उज्ज्वल निकम यांची नियुक्ती

**पुणे ।** पुण्यातील रिअल इस्टेट व्यावसायिक केतन अग्रवाल हत्या प्रकरणात ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनी मुलाच्या हत्येप्रकरणी निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही मागणी मान्य केल्यानंतर संबंधित विभागाला आवश्यक निर्देश देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १८ जून रोजी केतन अग्रवाल (२६) याचा लोहगड किल्ल्यावर मृत्यू झाला होता. या प्रकरणात त्याची मंगेतर सिया गोयल (१९), तिचा कथित प्रियकर चेतन चौधरी आणि चेतनचा मित्र रितेश संजय हांगे यांच्यावर आरोप ठेवण्यात आले आहेत. केतनला किल्ल्यावरून ढकलून त्याची हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे. सुरुवातीला ही घटना अपघात असल्याचे भासवण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा तपास यंत्रणांनी केला आहे.

# मध्य प्रदेशात भीषण अपघातात १२ जणांचा मृत्यू

## मंदिराजवळ घडली दुर्दैवी घटना : अनेक जखमी

**ग्वाल्हेर ।** मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथे शीतला माता मंदिराजवळ शनिवारी रात्री उशिरा भीषण अपघात झाला. भाविकांच्या गर्दीत भरधाव ट्रक घुसल्याने १२ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. या अपघातात मंदिराचे प्रवेशद्वार आणि बाहेरील भिंतीचेही नुकसान झाले. घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात रविवारी पहाटे सुमारे १:३० वाजण्याच्या सुमारास घडला. छिनोरच्या दिशेने येणारा धान्याने भरलेला ट्रक तीव्र उतारावरून खाली येत असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. अवजड वाहनांना प्रवेशबंदी असलेल्या या रस्त्यावर पोलिसांचे बॅरिकेड्स लावण्यात आले होते. मात्र, ट्रकने हे अडथळे तोडून पुढे जात रस्त्यावरील भाविकांना धडक दिली. त्यानंतर ट्रक मंदिराच्या प्रवेशद्वाराला आणि बाहेरील भिंतीला जाऊन धडकला.

ग्वाल्हेरचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक धर्मवीर सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, या दुर्घटनेनंतर ३९ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी १२ जणांचा मृत्यू झाला असून



काही जखमींची प्रकृती गंभीर आहे. अपघातात कर्तव्यावर असलेले दोन पोलीस कर्मचारीही जखमी झाले आहेत. जिल्हाधिकारी रुचिका चौहान यांनी सांगितले की, अपघाताची माहिती मिळताच रुग्णवाहिका आणि मदत पथके घटनास्थळी रवाना करण्यात आली. जखमींना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. नवरात्रीच्या काळात या मार्गावर पोलिसांची तपासणी चौकी आणि बॅरिकेड्स असतानाही ट्रक पुढे कसा गेला, याचा तपास सुरू आहे. ट्रकचे तांत्रिक कारण शोधण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) पथकाला वाहनाची तपासणी करण्यास सांगण्यात आले आहे. ट्रकचे नियंत्रण नेमके कशामुळे सुटले, याचा शोध घेतला जात आहे. घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका प्रत्यक्षदर्शीने ट्रक क्षमतेपेक्षा अधिक भरलेला असल्याचा दावा केला. ट्रक अचानक गर्दीत घुसल्याने अनेक जण गंभीर जखमी झाले, असे त्याने सांगितले. या अपघातात त्याचा भाऊही जखमी झाला आहे. या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, अपघातातील मृतांची आणि जखमींची अंतिम संख्या तसेच दुर्घटनेचे नेमके कारण याबाबत अधिकृत तपशीलांची प्रतीक्षा आहे.

cmyk

## संपादकीय

# बंदीचा बार...

गणेशोत्सवामध्ये ध्वनिप्रदूषणाच्या मुद्द्यावर जोरदार चर्चा झडल्यानंतर आता महिन्याभराने ध्वनी आणि हवेच्या प्रदूषणाचा विषयही ऐरणीवर आला आहे. सार्वजनिक ठिकाणी फटाके उडविण्यावर संपूर्ण वर्षभरासाठी बंदी असल्याचा मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला अंतरिम आदेश म्हणजे यापूर्वीचेच कायदे आणि विविध न्यायालयांनी त्या अनुषंगाने दिलेले निकाल, यांचाच पुनरुच्चार म्हणता येईल; ताज्या आदेशाचा संदर्भ येत्या दिवाळीतील आतषबाजीशी आहे.

दर वर्षी गणेशोत्सवापूर्वी पीओपीच्या मूर्ती–डीजेची ध्वनिमर्यादा आणि लांबणाऱ्या मिरवणुकांवर चर्चा होते आणि दिवाळी आली की फटाक्यांची वात पेटते. न्यायालये कायद्यातील तरतुदींनुसार आदेशही देतात. या सर्वांत समान धागा एकच; तो म्हणजे त्यांची अंमलबजावणी यंत्रणांना शक्य होत नाही आणि सण पार पडल्यावर पुन्हा आपण पुढील वादांसाठी सज्ज होतो. ही मालिका कुठे तरी थांबवायची असेल, तर तार्किकदृष्ट्या विचार करून कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य नियमावली तयार करून, तिच्या अंमलबजावणीसाठी संबंधित यंत्रणांमध्ये जबाबदारी निश्चित करावी लागेल. महत्त्वाचे म्हणजे त्यातून आरोग्यावर होणाऱ्या घातक परिणामांची जाणीव सर्वसामान्यांना अधिक परिणामकारकपणे करून द्यावी लागेल.

मुंबई शहर आणि महानगर परिसरात तीन वर्षांपूर्वी हवेची गुणवत्ता कमालीची खालावली. त्याचा नागरिकांच्या आरोग्याला धोका असल्याचे आढळून आल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने सुओ मोटो पद्धतीने ही याचिका दाखल करून घेतली. नुकत्याच पार पडलेल्या गणेशोत्सवातही रस्ते किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी फटाके उडवण्यावर बंदी घालण्यात आली होती; आता दिवाळीसह संपूर्ण वर्षभर ही बंदी लागू असल्याचे न्या. गिरीश कुलकर्णी व न्या. डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयातही याच विषयावर सुनावणी सुरू आहे. तेथे न्यायालयाने संपूर्ण फटाकेबंदी करता येणार नाही. आम्हाला कोणाच्याही धार्मिक भूमिका दुखवायच्या नाहीत; मात्र त्यासाठी नागरिकांच्या आरोग्याची किंमत मोजावी लागू नये, अशी भूमिका मांडली आहे. सर्वोच्च न्यायालयाने २४ तास फटाके उडवता येणार नाहीत, असे सांगून पर्यावरणस्नेही फटाक्यांच्या वापराला परवानगी दिली आहे. गेल्या काही काळात या फटाकेबंदीच्या अंमलबजावणीबाबत संभ्रम होता. आता न्यायालयाने महापालिका, राज्य सरकार आणि प्रदूषण नियंत्रण मंडळावर त्याची जबाबदारी टाकली आहे.

या वेगवेगळ्या आदेशांचे सार एकच आहे; ते म्हणजे फटाके उडवण्यावर सरसकट बंदी नाही, तर त्यावर वाजवी निर्बंध घालण्यावर न्यायालयांचा भर आहे आणि त्याबाबत मतभेद होण्याचे कारण नाही. सार्वजनिक ठिकाणी वर्षभर बंदी असल्याचे स्पष्ट झाल्याने आमच्याच उत्सवांमध्ये निर्बंध का, हा मुद्दा आता तरी निकाली निघण्यास हरकत नाही. फटाक्यांच्या अतिवापराचे दुष्परिणाम नव्याने सांगण्याची गरज नाही. पुण्या–मुंबईसह राज्यातील सर्वच शहरांमध्ये प्रदूषणाच्या पातळीने घातक मर्यादा पूर्वीच पार केली आहे. वर्षभरात वाहनांचा धूर आणि औद्योगिक प्रदूषणाला तोंड द्यावे लागते. दिवाळीनंतरच्या काळात अनेकांना दमा, हृदयविकार, स्नायूंची कमजोरी, श्वसनविकार, निमिया आणि मज्जासंस्थांवर परिणाम असा त्रास होतो; वृद्ध–गरोदर महिला आणि लहान मुलांना त्याचा सर्वाधिक त्रास सोसावा लागतो. गेल्या काही काळात प्रमुख शहरांमध्ये कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांचा वापर आणि ध्वनिप्रदूषण काही प्रमाणात कमी झाले, हे खरे आहे; मात्र त्यांची जागा शोभेच्या फटाक्यांनी घेतली आहे. हे फटाके हवेत फुटल्यानंतर त्याचा धूर आकाशात साठून राहतो आणि सकाळी तो पुन्हा खाली येऊन अधिक विघातक ठरतो, असे तज्ज्ञ सांगतात. फटाके उडवण्यातून कोणाला आनंद मिळत असेलही; मात्र प्रदूषणमुक्त पर्यावरण हासुद्धा इतर नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे, त्यावर अतिक्रमण करण्याचे कारण नाही. हा केवळ कायद्याचा प्रश्न नाही, तर सार्वजनिक जबाबदारीचा विषय आहे. दिवाळी हा आनंद आणि मांगल्याचा सण आहे; धडकी भरवणाऱ्या आवाजाचा किंवा श्वास कोंडणाऱ्या धुराचा नाही; एवढे लक्षात घेतले, तरी पुरे!

# सक्तीची रिटायरमेंट

दिल्लीत मी नवीनच होतो तेव्हा एका उष्ण संध्याकाळी जवळच्याच योजना आयोगाच्या दिशेने चालत गेलो तेव्हा पटेल चौक ओलांडताच घोषणाबाजी कानावर आली. इकडे कोण आंदोलन करतंय, मुळात हा कोणता भाग आहे, असं गर्दीतल्या एका व्यक्तीला विचारलं तेव्हा त्या उत्तरल्या, ये जंतर–मंतर है बेटा, यहीं से उस गोलघर में (संसद) बैठने वालों को सवाल करनेवाली असंख्य आवाजें निकलती है. नंतरच्या हिवाळी अधिवेशनात समजलं की त्या होत्या विदुषी कपिला वात्स्यायन! हेच जंतर –मंतर आंदोलनांच्या नकाशावरून पुसून टाकण्याचा निर्णय नुकताच आला आणि तो प्रसंग जसाच्या तसा डोळ्यांसमोर आला.



दिल्लीच्या जंतर–मंतरचा इतिहासही रंजक. जयपूरचे महाराजा सवाई जयसिंह यांनी १७२४ मध्ये दिल्लीत ही खगोलशास्त्रीय वेधशाळा उभारली. अलीकडच्या दोन दशकांचा विचार केला तर जंतर–मंतर–आकाशवाणीच्या परिसरात दिल्लीचे अनेक चेहरे समोर आले. भल्या पहाटे अशोका, पंडित पंत मार्गांवरील माननीयांच्या घरी दूध, वृत्तपत्रे घेऊन निघालेली मुलं, नंतर दिवसभर सत्तेच्या दिशेने धावणाऱ्या गाड्या, कार्यालयांकडं निघालेल्या बाबूशाहीची लगबग, सुरक्षेच्या कडेकोट व्यवस्थेतून मार्ग काढणारी माणसं आणि त्याच रस्त्यांवर हातात फलक घेऊन किंवा पदपथांवर पथारी मांडलेले आंदोलनकर्ते! पूर्वीच्या राजपथावरचा बोट क्लब ते जंतर–मंतर या प्रवासात सत्तेचा रुबाब दाखवणाऱ्यांचा दर्प व दुसरीकडे न्यायासाठी उन्हातान्हात उभे असणाऱ्या आम आदमीचा घाम... दिल्लीनं या दोघांनाही जवळजवळ चिकटवून ठेवलं असावं. जंतर–मंतर या जागेलाच काहीतरी विलक्षण स्मरणशक्ती असावी. इथं रोज नवे चेहरे येत, नवे फलक झळकत, घोषणा बदलत; पण डोळ्यांतले प्रश्न मात्र तसेच असत. जंतर–मंतरला एक प्रकारे सीआरएस देऊन सक्तीनं रिटायर केलं गेलं खरं ! पण निवृत्त झालं कोण? रस्ता, ठिकाण का लोकशाहीची एक परंपरा? सत्तेला अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांना सामोरे जाण्याच्या भीतीतून झालेली ही कारवाई असल्याचा आरोप कसा नजरेआड करणार?



सिंहासन खाली करो की जनता आती है, या ओळी घुमल्या असा बोट क्लब, रामलीला मैदानासारखा दरारा जंतर–मंतरला भले मिळाला नसेल; पण गेल्या दोनेक दशकांत जंतर–मंतरनं सामाजिक आणि राजकीय अस्वस्थतेची अनेक रूपं पाहिली. निवृत्त सैनिकांच्या वन रँक वन पेन्शनच्या मागण्या, अण्णा हजारेंचा चेहरा पुढे करून झालेलं भ्रष्टाचारविरोधी आंदोलन, निर्भया प्रकरणानंतर महिलांच्या सुरक्षिततेचे प्रश्न, सामाजिक न्यायासाठीचे संघर्ष, भारतीय मजदूर संघासह विविध कर्मचारी संघटनांचे मोर्चे अशा अनेक मागण्यांनी या रस्त्याला व्यासपीठ मानलं. संसदेपासून जेमतेम दीड किलोमीटरवर



आणि सरकारी कार्यालये आणि सत्ताकेंद्रांच्या जवळचं जंतर–मंतर आंदोलनकर्त्यांसाठी प्रतीकात्मकदृष्ट्या प्रभावी होतं. नव्या फतव्यानुसार आता फक्त रामलीला मैदान, बुराडीतील आणि पूर्व दिल्लीतील सीबीडी मैदान ही पर्यायी ठिकाणंच आंदोलनांसाठी उपलब्ध असतील. रामलीला मैदान सुमारे चार किलोमीटर, सीबीडी बारा ते तेरा किलोमीटरवर आणि बुराडी मैदान सुमारे एकवीस किलोमीटर दूर. रामलीला सोडलं तर उरलेल्या दूरवरच्या मैदानांत गुरंही जात नाहीत, हे सध्याचं चित्र आहे. अर्थात प्रशासनाच्या दृष्टीनं मध्य दिल्लीच्याही मध्यभागी मोठ्या गर्दीचं नियोजन, वाहतुकीची कोंडी, वाहनचालक, रहिवाशांची गैरसोय आणि सुरक्षेची आव्हानं हे मुद्दे आहेतच. सार्वजनिक सुव्यवस्था राखणं ही पोलिसांची जबाबदारी आहेच. पण नियमांची अंमलबजावणी, गर्दीचं व्यवस्थापन आणि गर्दीच गायब करण्याचे उपद्व्याप यातही फरक आहे.

नव्यापैकी दोन मैदानांसाठी सुधारित प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी), अटीशर्ती अजूनही जारी झालेल्या नाहीत. सर्वोच्च न्यायालयानंच जंतर–मंतरला पर्याय शोधण्याची सूचना सरकारला केली होती व आता या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिलं गेलंय. लोकशाहीत ज्यांचा आवाज ऐकायचा त्यांच्यापासूनच आंदोलनं दूर गेली तर त्यांचा परिणाम कमी होणारच. आउट ऑफ साईट, आउट ऑफ माईंड (नजरेआड ते मनाआड) ही म्हण इथं आठवते. अर्थात आंदोलनाचा अधिकार अमर्याद नाहीच. सार्वजनिक सुव्यवस्था आणि इतर नागरिकांचे अधिकार जपण्यासाठी वाजवी, आवश्यक, प्रमाणबद्ध आणि पारदर्शक निर्बंध घालता येतात. न्यायालयीन परीक्षणातूनच या निर्णयाची वैधता स्पष्ट होईलच, पण निर्णय उलटा फिरण्याची चिन्हं तूर्तास अंधूक.

आज ज्यांचा आवाज इथं गैरसोयीचा वाटतो उद्या त्याच जागेची गरज दुसऱ्या विचारांच्या लोकांना भासू शकते. मुळात आपल्याकडे सत्तेपर्यंत पोहोचण्यासाठी अनेकांना आधीच अर्ज, निवेदने, भेटीची वेळ, शिफारस, पाठपुरावा आणि मग पुन्हा प्रतीक्षा... अशा किती दारांवर धडका द्याव्या लागतात! या सगळ्यानंतरही न्याय मिळाला नाही, तर निदान रस्त्यावर उभे राहून आपली व्यथा सांगण्याचा पर्याय असतो. आता त्या पर्यायासाठीही लांबचं अंतर, आणि जास्त परवानग्या लागणार असतील तर सामान्य माणसाच्या संयमाची परीक्षा नेमकं कोण घेत आहे, हा प्रश्न येणारच. जंतर–मंतरच्या दोन्ही रस्त्यांवर सध्या आणि इथला हजारोंचा सशस्त्र बंदोबस्त हटल्यानंतरही पूर्वीसारखी गर्दी नसेल. घोषणांचे आवाज नसतील, परिसराला कदाचित अधिक शिस्तबद्ध रूपडं मिळेल. पण लोकशाहीत महागाई, बेरोजगारीनं गांजलेल्या कोट्यवधींचे आवाज निनादत राहतीलच.

दैनिक व्याघ्र शौर्यम

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रहीम शेख बाबू यांनी लोकशाही ऑफसेट एम–६९, एमआयडीसी जळगाव येथे छापून इस्लाम पुरा, जामनेर, जळगाव, महाराष्ट्र – ४२४२०६ येथे प्रसिद्ध केले. आर.एन.आय.नं. MHMAR/25/A2382

printed by the owner, printer, publisher, editor Sheikh Rahim Sheikh Babu at Lokshahi Offset M-69, MIDC Jalgaon and published at Islam Pura, Jamner, Jalgaon, Maharashtra - 424206. R.N.I. No. MHMAR/25/A2382

# राष्ट्रीयीकरणाला पूर्णविराम

आयडीबीआय बँकेतील सरकार आणि एलआयसीच्या हिस्साविक्रीला केंद्रीय मंत्रिमंडळाने दिलेली मान्यता, हा उद्योग-व्यवसायातून बाहेर पडण्याच्या सरकारी धोरणांना साजेसा निर्णय म्हणता येईल. कॅनडास्थित प्रेम वत्स यांच्या फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंगची उपकंपनी कॅनडा इंकला ५२ हजार ८७८ कोटी रुपयांना हा हिस्सा विकण्याचा व्यवहार काही वर्षांच्या चर्चा-वादांनंतर अखेर सरकारने मार्गी लावला.

एअर इंडियानंतरची ही सर्वांत मोठी निर्गुंतवणूक. त्याबरोबरच गेल्या काही काळात विदेशी गुंतवणूकदारांनी पाठ फिरवलेली असताना वित्तीय क्षेत्रात झालेली ही मोठी गुंतवणूक हा सरकार आणि अर्थव्यवस्था या दोघांसाठी नक्कीच दिलासा देणारी बाब म्हणता येईल. एके काळी सार्वजनिक क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या आयडीबीआयला खासगी बँकेचा दर्जा मिळाला होताच; आता या व्यवहारानंतर बँकेचे व्यवस्थापन शब्दश: खासगी हातांत जाईल. सार्वजनिक क्षेत्रातील आणखी काही प्रमुख बँकाही याच खासगीकरणाच्या रांगेत असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे एका अर्थाने बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या धोरणाला ५७ वर्षांनी मिळालेला हा पूर्णविराम ठरणार आहे. त्यामुळेच या निर्णयामागील कारणे, त्याचे भले-बुरे परिणाम आणि बँकांचे





केंद्रीकरण व एकंदर बँकिंग क्षेत्राचे भवितव्य आयडीबीआयची स्थापना झाली. तत्कालीन बँका केवळ धनाढ्यांचे हित पाहात असून विकासाची सामाजिक जबाबदारी पार पाडत नाहीत, या भूमिकेतून तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. सन २००४मध्ये या बँकेला व्यापारी बँकेचा दर्जा मिळाला असला, तरी ५१ टक्के मालकी सरकारचीच राहील, असे आश्वासन तत्कालीन अर्थमंत्र्यांनी संसदेत दिले होते; ताज्या व्यवहारामुळे सरकारने विश्वासघात केल्याची टीका विरोधक आणि कर्मचारी संघटना करीत आहेत. मात्र, ही वेळ का आली याचाही विचार आवश्यक आहे. आयडीबीआयबाबतही तेच घडले. प्रमुख जहाज कंपन्या, वीज-पोलाद, वाहन आणि घरगुती उपकरणे बनवणाऱ्या बड्या कंपन्यांची कर्जे बुडीत खात्यात (एनपीए) गेल्याने बँक अडचणीत आली. काही वर्षांपूर्वी त्याचे प्रमाण तब्बल ३२ टक्के होते. तेव्हा सरकार आणि एलआयसीने बँकेला गुंतवणुकीचा ऑक्सिजन पुरवला. आता बँकेचे एनपीएचे प्रमाण अडीच टक्क्यांपर्यंत खाली आले असून, गेली काही वर्षे बँक नफ्यात आहे. बँका वाचवण्याच्या हेतूने सरकारने पुनर्भांडवलीकरणासाठी जनतेचा पैसा ओतण्याचे सत्र सर्रास सुरू आहे. गेल्या काही काळात सरकारने काही लाख कोटी रुपये त्यापोटी गुंतवले. त्यातच व्यवसाय चालवणे ही सरकारची जबाबदारी नाही, हे तत्त्व सरकारांनी मनोमन स्वीकारल्याने अशा बँकांमधून भांडवल काढून घेणे सरकारसाठी अपरिहार्य आणि निर्गुंतवणुकीच्या दिशेला साजेसेच आहे.

आता या भांडवलाच्या आधारे बँकेचा विस्तार-व्यवसायवृद्धी होईल आणि दबावमुक्त-स्वतंत्रपणे बँका चालवणे शक्य होईल, असे सांगितले जाते. मात्र, मूठभरांची भांडवलशाही आणि बँकिंगमधील वरिष्ठ पातळीवरील व्यवस्थापनातील साटेलोटे यांमुळे खासगी बँकांमध्येही सारेच आलबेल असल्याचे चित्र खचितच नाही. त्यामुळे खासगीकरणातून सारे प्रश्न सुटतील, असे म्हणण्यात अर्थ नाही. खासगी बँकांचे एनपीए, त्यातील बड्या उद्योगपतींच्या कर्जांचे प्रमाण आणि हेअरकटचे प्रकार पाहता या क्षेत्रात पारदर्शकतेस किती वाव आहे, याची कल्पना येईल. बँकांच्या व्यवस्थापनासह रिझर्व्ह बँक आणि सरकारलाही या जबाबदारीकडे पाठ फिरवता येणार नाही. त्याबरोबरच देशात बँकांची संख्या मोजकीच ठेवण्याचा कार्यक्रम सगळ्याच सरकारांकडून पद्धतशीरपणे राबवण्यात येत असून, ही संख्या २७ वरून १२पर्यंत आणण्यात आली आहे. बँकांचा विस्तार, सर्वसामान्यांना मिळणाऱ्या सेवा आणि शेती किंवा लघु व मध्यम उद्योगांच्या वित्तपुरवठ्यावर त्याचा परिणाम नक्कीच होणार आहे. बँकांच्या खासगीकरणाची ही नांदी असून, त्याचे अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होणार, यावर गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे

# राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयात आरोग्य तपासणी

**पारोळा ।** विद्यार्थ्यांचा सुदृढ आरोग्यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत येथील राणी लक्ष्मीबाई कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी व समुपदेशन उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत एकूण सहभागी ५७६ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यापैकी ९० विद्यार्थ्यांना मोफत उपचार मिळणार आहेत. डॉ. पंकज नेरकर, डॉ. सायली पाटील आणि आरोग्य सेविका सुनिता मोरे यांनी विद्यार्थ्यांची आवश्यक आरोग्यबाबत तपासणी करून त्यांना माहिती मार्गदर्शन केले. तसेच आरोग्याच्या विविध समस्यांबाबत उपचार व योग्य समुपदेशन केले. यात दम लागणे, शरीरावर चट्टे, पांढरे डाग किंवा गाठी, झटके / मिरगीचा त्रास, नेत्र, दंत व हिरड्यांचा समस्या, रक्त तपासणी, सीटी स्कॅन, एमआरआय, एक्स-रे ईसीजी, घसा, ३ लघवी, अपेंडिक्सचा त्रास आदींचा समावेश आहे.

# लोहारा आश्रमशाळेत १२५ विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन!

## दहावीनंतरच्या शैक्षणिक व व्यावसायिक संधींची माहिती

**कोरपावली । फिरोज तडवी**

**लोहारा :** विद्यार्थ्यांना दहावीनंतर उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक व व्यावसायिक संधींची माहिती मिळावी, तसेच त्यांना भविष्यातील करिअर निवडीसाठी योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने लोकसेवक मधुकरराव चौधरी आश्रमशाळा, लोहारा येथे करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समता फाउंडेशनच्या करिअर मार्गदर्शन उपक्रमांतर्गत आयोजित या कार्यक्रमात इयत्ता नववी व दहावीतील एकूण १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी जे. टी. महाजन अभियांत्रिकी महाविद्यालय, फैजपूर येथील उपप्राचार्य तथा यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. जी. ई. चौधरी आणि याच विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. पी. पी. थोम्बरे यांनी मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली.

**आयटीआय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांची माहिती**

मार्गदर्शनादरम्यान विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) इलेक्ट्रिशियन, फिटर, वेल्डर, कोपा (उजझ-), मेकॅनिक, वायरमन आणि इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक यांसह विविध तांत्रिक अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आली. या अभ्यासक्रमांमधून मिळणारे व्यावसायिक कौशल्य आणि रोजगाराच्या संधी यांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.तसेच दहावीनंतर अभियांत्रिकी क्षेत्रात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यांत्रिकी, स्थापत्य, संगणक, विद्युत, इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार आणि ऑटोमोबाईल अभियांत्रिकी या पदविका अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आली. प्रवेशासाठी आवश्यक पात्रता, प्रवेश प्रक्रिया आणि भविष्यातील करिअरच्या संधी यांवरही प्रकाश टाकण्यात आला.

# शेतकऱ्यांच्या पाठीशी शिवसेना ठामपणे उभी!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

**डोंबिवली ।** दुष्काळामुळे संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना मदत करण्यासाठी शिवसेना ठामपणे त्यांच्या पाठीशी उभी आहे. शेतकरी कुटुंबांतील महिलांना शिलाई मशीनचे वाटप, शेतकऱ्यांच्या मुलींच्या विवाहासाठी आर्थिक मदत आणि दसरा मेळाव्याच्या दिवशी दिवाळीचा शिधा पाठवण्यात येणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. डोंबिवलीतील डीएनसी शाळेच्या मैदानावर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि श्री नवदुर्गा युवा मंडळ यांच्या वतीने आयोजित शारदीय नवरात्रोत्सवाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी देवीचे दर्शन घेतले आणि उपस्थितांशी संवाद साधला. दुष्काळाचे संकट दूर होऊन शेतकरी बांधवांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना त्यांनी देवीचरणी केली.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून आयोजित या नवरात्रोत्सवात यंदा दांडियाऐवजी भजनसंध्या आणि संगीत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवातून मिळणारा निधी दुष्काळग्रस्त भागांतील शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरण्यात येत आहे. कोकणातील विविध भजन मंडळांनी सादर केलेल्या देवीच्या भजनांनी, गणेशभजनांनी आणि पारंपरिक भक्तिगीतांनी परिसर भक्तिमय झाला. महाराष्ट्राला संत आणि कष्टकऱ्यांची परंपरा लाभली आहे. भक्तिगीते, भजने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न होत आहे. अशा उत्सवांमुळे समाज एकत्र येतो आणि आपल्या संस्कृतीची ओळख अधिक दृढ होते, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. या उपक्रमाबद्दल त्यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांतील महिलांना शिलाई मशीन देऊन त्यांना स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच शेतकऱ्यांच्या मुलींच्या विवाहासाठीही मदत करण्यात येणार आहे. दसरा मेळाव्याच्या दिवशी दुष्काळग्रस्त कुटुंबांसाठी दिवाळीचा शिधा घेऊन जाणारे अनेक ट्रक रवाना करण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. यावेळी शिवसेनेच्या स्थानिक नगरसेवकांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतनिधीचे धनादेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्द केले. संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना आधार देणे ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी असल्याची भावना या उपक्रमातून व्यक्त करण्यात आली.

# फैजपूर नगरपरिषदेच्या शिक्षण कर वसुलीवर मोठे प्रश्नचिन्ह!

## मालमत्ता बिलातील शिक्षण करावर आक्षेप; हिशेब जाहीर करण्याची मागणी

**यावल। राजु पिंजारी**

फैजपूर नगरपरिषदेकडून नागरिकांच्या मालमत्ता कर बिलामध्ये शिक्षण कराच्या नावाखाली अतिरिक्त रक्कम आकारली जात असल्याच्या मुद्द्यावर आता प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या शिक्षण कराच्या आकारणीमागील कायदेशीर आधार काय, कोणत्या शासन निर्णयानुसार ही वसुली केली जात आहे आणि आजपर्यंत नागरिकांकडून किती रक्कम जमा करण्यात आली, याचा संपूर्ण तपशील सार्वजनिक करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाचे रावेर लोकसभा जिल्हाध्यक्ष तथा फैजपूर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष शेख कुर्बान हाजी अब्दुल करीम यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर करून प्रशासनाकडे स्पष्ट खुलासा मागितला आहे.

**शिक्षण कराच्या आकारणीचा कायदेशीर आधार कोणता?**

नगरपरिषदेच्या मालमत्ता कर बिलामध्ये शिक्षण कराचा समावेश केला जात असेल, तर त्यासाठी लागू असलेली कायदेशीर तरतूद नेमकी कोणती, कोणत्या कायद्याच्या कोणत्या कलमानुसार हा कर आकारला जातो आणि त्यासाठी कोणता शासन निर्णय अथवा प्रशासकीय आदेश लागू करण्यात आला आहे, याची स्पष्ट माहिती नागरिकांना मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शिक्षण कराचा निश्चित दर किती आहे, त्याची गणना कोणत्या पद्धतीने केली जाते आणि या करातून जमा होणाऱ्या निधीचा वापर कोणत्या शैक्षणिक कामांसाठी केला जातो, याबाबतही नगरपरिषद प्रशासनाने लेखी स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

**वर्षनिहाय वसुलीचा हिशेब जनतेसमोर आणा!**

शिक्षण कराच्या नावाखाली आजपर्यंत किती रक्कम वसूल करण्यात आली, आर्थिक वर्षानुसार किती महसूल जमा झाला, किती रक्कम खर्च करण्यात आली आणि सध्या किती निधी शिल्लक आहे, याचा सविस्तर लेखाजोखा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच या कराच्या आकारणीसाठी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेची किंवा संबंधित सक्षम प्राधिकरणाची आवश्यक मंजुरी घेण्यात आली आहे का, याचीही माहिती द्यावी. कर आकारणीसंदर्भातील ठराव, आदेश आणि संबंधित कागदपत्रांच्या आधारे प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करावी, असे शेख कुर्बान शेख करीम यांनी म्हटले आहे.



**नागरिकांच्या पैशांचा हिशेब देण्याची जबाबदारी प्रशासनाची!**

मालमत्ता कर हा सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक व्यवहारांशी थेट संबंधित विषय आहे. त्यामुळे नागरिकांकडून वसूल करण्यात येणाऱ्या प्रत्येक करामागील कायदेशीर आधार, आकारणीची पद्धत आणि जमा झालेल्या निधीचा विनियोग याबाबत पारदर्शकता असणे गरजेचे आहे.शिक्षण कराची आकारणी लागू कायदे, नियम आणि शासनाच्या निर्देशांनुसार होत आहे की नाही, याची तपासणी करून प्रशासनाने नागरिकांच्या शंकांचे निरसन करावे. केवळ बिलामध्ये कराचा उल्लेख आहे म्हणून त्याबाबत प्रश्न विचारण्याचा नागरिकांचा अधिकार संपत नाही. संबंधित कराच्या आकारणीची कायदेशीर वैधता आणि त्यासंबंधीची कागदपत्रे स्पष्ट होणे आवश्यक आहे, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.

**कायदेशीर आधार नसेल तर वसुली थांबवून योग्य कार्यवाही करा!**

शिक्षण कराची आकारणी कायदेशीर तरतुदींनुसार होत असल्यास त्यासंबंधीचे नियम आणि आदेश प्रशासनाने स्पष्ट करावेत. मात्र, तपासणीत आवश्यक कायदेशीर आधार नसल्याचे निष्पन्न झाल्यास नियमानुसार पुढील कार्यवाही करून संबंधित वसुलीबाबत योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

**नगरपरिषद प्रशासनाच्या भूमिकेकडे शहरवासीयांचे लक्ष**

फैजपूर नगरपरिषदेच्या मालमत्ता कर बिलातील शिक्षण कराच्या आकारणीबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांमुळे आता नगरपरिषद प्रशासन काय स्पष्टीकरण देते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. या कराचा कायदेशीर आधार, आकारणीचा दर, वर्षनिहाय वसुली आणि निधीच्या विनियोगाची माहिती प्रशासनाकडून उपलब्ध होते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. शिक्षण कराच्या आकारणीबाबत पारदर्शकता आणून नागरिकांना स्पष्ट उत्तरे द्यावीत, हीच या निवेदनामागील प्रमुख मागणी असून, नगरपरिषद प्रशासनाच्या अधिकृत उत्तरानंतर या प्रकरणातील वस्तुस्थिती अधिक स्पष्ट होणार आहे.

# जिल्हास्तरीय राष्ट्रीय इनोव्हेशन चॅलेंज उत्साहात

**जळगाव :** भारतीय जनता पार्टी, जळगाव महानगरच्या वतीने सेवा संकल्प अभियान - २०२६ अंतर्गत जिल्हास्तरीय राष्ट्रीय इनोव्हेशन चॅलेंज कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण विचार, सर्जनशीलता, संशोधन वृत्ती आणि उद्योजकता प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात ४७ महाविद्यालयांतील स्टार्टअप्सनी सहभाग नोंदविला. यावेळी सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित चित्रकला स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करून गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या



कलागुणांना, वक्तृत्व कौशल्याला आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देतानाच त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा उपक्रम ठरला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, जळगाव लोकसभेच्या खासदार स्मिता वाघ, जळगाव शहराचे आमदार सुरेश भोळे (राजूमामा), भाजपा जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष दिपक सूर्यवंशी, जळगाव महानगरपालिकेच्या महापौर दिपमाला काळे, भाजपा माजी महानगर जिल्हाध्यक्ष उज्वला बेंडाळे, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, गटनेते प्रकाशजी बालाणी, सरचिटणीस विशाल त्रिपाठी, नितीन इंगळे संतोष इंगळे व रवींद्र फालक यांची प्रमुख उपस्थिती होती.

# हुजैफा शेखची आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड

**जामनेर ।** येथील जिकरा इंग्लिश मीडियम स्कूलचा इयत्ता सातवीतील विद्यार्थी हुजैफा शेख अब्दुल हफीज याची आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

येत्या २४ व २५ ऑक्टोबर २०२६ रोजी गुजरात राज्यातील अंकलेश्वर येथील सौ. पी. डी. श्रॉफ संस्कारदीप विद्यालयात हे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात सहभागी होण्याची संधी



मिळाल्याने हुजैफा याने शाळेच्या शैक्षणिक यशात मानाची भर घातली आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून त्याला आपली वैज्ञानिक कल्पना सादर करण्याची तसेच विविध वैज्ञानिक संकल्पना जाणून घेण्याची संधी मिळणार आहे.

# रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी एलिटतर्फे हँडवॉश जनजागृती

**जळगाव।** जागतिक हात धुणे दिनाचे औचित्य साधून रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी एलिट, जळगाव यांच्या वतीने एमआयडीसी परिसरातील पंढरपूर नगर, विणूज वर्ल्ड जवळील काठियावाडी भागात हँडवॉश जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून परिसरातील गरजू व वंचित कुटुंबांमध्ये वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यात




आली. या मोहिमेदरम्यान परिसरातील नागरिकांना आणि बालकांना हात धुण्याची योग्य पद्धत, दैनंदिन स्वच्छतेचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैलीसाठी स्वच्छतेच्या सवयींची आवश्यकता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. जेवणापूर्वी आणि शौचालयाचा वापर केल्यानंतर साबणाने हात धुण्याची सवय लावल्यास अनेक संसर्गजन्य आजारांचा धोका कमी करण्यास मदत होते, याबाबतही नागरिकांना माहिती देण्यात आली. नागरिकांना स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने मोहिमेदरम्यान जीवनावश्यक स्वच्छता साहित्याचे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचून आरोग्यविषयक जनजागृती करण्याचा रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी एलिटचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरला. स्वच्छतेच्या साध्या सवयींमधून निरोगी समाज घडविण्याचा संदेश देणाऱ्या या मोहिमेचे परिसरातून स्वागत करण्यात आले.

# वोट चोर, गादी सोडा! च्या घोषणांनी रावेर दणाणले; मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्यासाठी काँग्रेस आक्रमक!

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालयापर्यंत पायी मोर्चा; ज्ञानेश कुमार यांच्या अटकेचीही मागणी

रावेर ✍ प्रतिनिधी





मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून रावेरमध्ये काँग्रेसने शनिवारी आक्रमक पवित्रा घेतला. रावेर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून तहसील कार्यालयापर्यंत पायी मोर्चा काढण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. मोर्चानंतर तहसीलदार संजय तायडे यांना निवेदन देऊन मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. प्रदर्शनात सहभागी कार्यकर्त्यांच्या हातात विविध मागण्यांचे फलक होते. ज्ञानेश कुमार मुर्दाबाद, ज्ञानेश कुमार राजीनामा द्या आणि वोट चोर, गादी सोडा! अशा घोषणांनी वातावरण तापले. याशिवाय भाजपला लक्ष्य करणाऱ्या घोषणाही देण्यात आल्या. काँग्रेसने आरोप केला की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सांगण्यावरून ज्ञानेश कुमार यांनी विविध राज्यांमध्ये कथितरीत्या चोरीची सरकारे स्थापन होण्यास मदत केली. या आरोपांमुळे निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेबाबत प्रश्न उपस्थित होत असल्याचे काँग्रेस कार्यकर्त्यांनी म्हटले.

**राजीनाम्यानंतर अटकेचीही मागणी**

रावेर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष धुमा तायडे यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अटकेची मागणी केली. त्यांच्या मते, ज्ञानेश कुमार यांना या पदावर कायम राहण्याचा नैतिक अधिकार नाही. लोकशाहीचे संरक्षण आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी काँग्रेसचा संघर्ष यापुढेही सुरू राहील, अशी भूमिका पक्षाच्या नेत्यांनी मांडली.जळगाव जिल्हा काँग्रेस अध्यक्ष धनंजय चौधरी यांनीही शांततापूर्ण आंदोलन सुरू ठेवण्याच्या भूमिकेला पाठिंबा दिला.

**काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी**

या मोर्चात जळगाव जिल्हा काँग्रेस अध्यक्ष धनंजय चौधरी, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र पाटील, जळगावचे माजी सचिव ड. योगेश गजरे, रावेर तालुकाध्यक्ष यशवंत पाटील, रावेर शहराध्यक्ष संघरक्षक (धुमा) तायडे, सुनील कोंडे, मंजूर मन्यार, इस्माईल पहलवान, रामदास लहासे, सावन मेढे, महेंद्र गजरे, असलम शेख, आशीष पाठक, संतोष पाटील आणि इमरान खान यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगतर्फे राष्ट्रीय रील्स स्पर्धा

जळगाव ✍ प्रतिनिधी




गोदावरी फाऊंडेशन संचलित, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक संलग्न आणि नॅक मान्यताप्राप्त गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग, जळगावच्या वतीने आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त राष्ट्रीय स्तरावरील रील्स स्पर्धेचे आयोजन ऑनलाइन झूम प्लॅटफॉर्मद्वारे करण्यात आले.

महिला प्रसूती व स्त्रीरोग परिचर्या विभाग आणि नर्सिंग स्कॉलर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेची संकल्पनाङ्गबालविवाह रोखा, मुलींच्या हक्कांमध्ये गुंतवणूक करा!फ अशी होती. बालविवाहाचे दुष्परिणाम, मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व, स्त्री-पुरुष समानता आणि मुलींच्या हक्कांचे संरक्षण याविषयी समाजात जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. . स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी १, ५०० रुपये, तर द्वितीय क्रमांकासाठी १, ००० रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले होते. गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगच्या प्राचार्य प्रा. डॉ. विशाखा गणवीर अध्यक्षतेस्थानी तर त्यांच्या सोबत उपप्राचार्य प्रा. जंकनिथ धाया सी. परीक्षक, सुरत येथील व्हायब्रंट नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य प्रा. डॉ. अलका ताजने यांनी परीक्षक म्हणून योगदान दिले नर्सिंग स्कॉलर सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. बिनू जो, महिला प्रसूती व स्त्रीरोग परिचर्या विभागाच्या प्रमुख प्रा. मेनाओ देवी खुराईजम, प्रा. स्नेहल जांभूळकर, प्रा. कोलेट लोंढे (एम. एस्सी. ट्यूटर), प्रा. अहिंसा लोखंडे आणि प्रा. निकिता रामटेके यांनी एम. एस्सी. नर्सिंग प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने केले. या राष्ट्रीय स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपली सर्जनशीलता, संवादकौशल्य आणि सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले.

# मण्यारखेडा शाळेत गोदावरी आयएमआरतर्फे हात धुण्याबाबत जनजागृती

**जळगाव** । ग्लोबल हँडवॉशिंग डे अर्थात जागतिक हात धुणे दिनानिमित्त गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च (आयएमआर), जळगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागातर्फे मण्यारखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आरोग्य व स्वच्छता जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच वैयक्तिक स्वच्छतेच्या चांगल्या सवयी रुजविणे आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाला माजी सरपंच राजूदादा, ग्रामसेविका आणि शाळेचे मुख्याध्यापक जगन्नाथ कोळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.यावेळी एनएसएस स्वयंसेवकांनी शालेय विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. हात योग्य पद्धतीने कसे धुवावेत, याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. जेवणापूर्वी, शौचालयाचा वापर केल्यानंतर तसेच हात अस्वच्छ झाल्यावर साबणाने हात धुणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. नियमित हात धुण्याच्या सवयीमुळे अनेक संसर्गजन्य आजारांचा धोका कमी करण्यास मदत होते.

# फैजपूर नगरपरिषदेत अधिकारी–कर्मचाऱ्यांसाठी ड्रेसकोड आणि ओळखपत्र अनिवार्य करण्याची मागणी!

## नगरसेविका सौ. सुमय्या शेख कुर्बान यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन; ३० दिवसांत अंमलबजावणीचे आदेश काढण्याची मागणी

**फैजपूर ।** नगरपरिषदेच्या कामकाजात शिस्त, पारदर्शकता आणि जबाबदारी वाढविण्यासाठी फैजपूर नगरपरिषदेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पदानुसार ड्रेसकोड आणि अधिकृत ओळखपत्र अनिवार्य करण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका सौ. सुमय्या शेख कुर्बान यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी फैजपूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनानुसार, नगरपरिषदेत कार्यरत असलेले शिपाई, सफाई कर्मचारी, लिपिक, विभागप्रमुख तसेच इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र ड्रेसकोड निश्चित करण्यात यावा. शिपाई व इतर कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र गणवेश, तर अधिकारी व विभागप्रमुखांसाठी पदानुसार ड्रेसकोड लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना अधिकृत ओळखपत्र (आयडेंटिटी कार्ड) देण्यात यावे. कार्यालयीन वेळेत ते गळ्यात किंवा सहज दिसेल अशा ठिकाणी परिधान करणे बंधनकारक करण्यात यावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**कार्यालयीन शिस्तीसह नागरिकांना मिळणार दिलासा!**

ड्रेसकोड आणि ओळखपत्र अनिवार्य केल्यास नागरिकांना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची ओळख पटविणे सोपे होईल. तसेच कार्यालयीन कामकाजात शिस्त राखण्यास, पारदर्शकता वाढविण्यास आणि नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यास मदत होईल, अशी भूमिका नगरसेविका सुमय्या शेख कुर्बान यांनी मांडली आहे. या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन ड्रेसकोड व ओळखपत्राबाबत प्रशासकीय आदेश तातडीने निर्गमित करावेत. आदेश काढल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त ३० दिवसांची निश्चित मुदत देऊन त्याची अंमलबजावणी करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. आता या निवेदनावर नगरपरिषद प्रशासन काय भूमिका घेते आणि ड्रेसकोड व ओळखपत्राच्या मागणीची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होते, याकडे फैजपूरकरांचे लक्ष लागले आहे.

cmyk

# अँग्लो उर्दू हायस्कूल, पाचोऱ्याची कबड्डीत दणदणीत बाजी!

## १४ वर्षाखालील मुलांच्या संघाचे तालुकास्तरीय स्पर्धेत विजेतेपद; अजहर खान सरांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी!

**पाचोरा ।** जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील माध्यमिक विद्यालय, घुसर्डी येथे आयोजित तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत अँग्लो उर्दू हायस्कूल, पाचोरा येथील १४ वर्षाखालील मुलांच्या संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपदावर आपले नाव कोरले! विद्यार्थ्यांनी दाखवलेली जिद्द, चपळाई, उत्कृष्ट खेळ आणि सांघिक समन्वय यांच्या जोरावर मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**मैदानावर जिद्द, खेळात दमदार कामगिरी!**

स्पर्धेदरम्यान अँग्लो उर्दू हायस्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, शिस्त, मेहनत आणि सांघिक भावनेचे दर्शन घडविले. प्रतिस्पर्ध्यांना समर्थपणे आव्हान देत संघाने प्रथम क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांच्या या यशातून नियमित सराव, चिकाटी आणि क्रीडा क्षेत्रातील मेहनतीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

**अजहर खान सरांचे मार्गदर्शन ठरले मोलाचे!**

या उल्लेखनीय यशामागे क्रीडा शिक्षक श्री. अजहर खान सर यांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांचा नियमित सराव आणि कठोर परिश्रम यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या



मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आपल्या खेळातील कौशल्य सिद्ध करत शाळेला तालुकास्तरावर गौरव मिळवून दिला.

**शाळेत अभिनंदनाचा वर्षाव!**

या दैदिप्यमान यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले असून, आगामी स्पर्धांमध्येही अशीच उज्वल कामगिरी करण्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. अँग्लो उर्दू हायस्कूलच्या या विजयामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# वाचनातून ज्ञानवृद्धीसह व्यक्तिमत्त्व विकासाला चालना!

## विद्यापीठात वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शन : संवाद कौशल्यावर विशेष व्याख्यान

**जळगाव ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील ज्ञानस्त्रोत केंद्राच्या वतीने भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यापीठाच्या ग्रंथालयात भव्य ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी आणि प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले. वाचनामुळे ज्ञानात भर पडण्यासोबतच विचारांना व्यापकता, आकलनशक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाच्या पुस्तकांबरोबरच चरित्रे, आत्मचरित्रे, संशोधनपर साहित्य आणि विविध विषयांवरील ग्रंथांचेही वाचन करावे, असे त्यांनी सांगितले.

यानंतर ग्रंथालय साहित्याच्या माध्यमातून संवाद कौशल्य या विषयावर विशेष व्याख्यान झाले. हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनील बा. कुळकर्णी प्रमुख वक्ते होते, तर रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. दीपक एस. दलाल अध्यक्षस्थानी होते. प्रा. डॉ. कुळकर्णी यांनी नियमित वाचनामुळे भाषिक क्षमता, शब्दसंपत्ती, विचारांची स्पष्टता आणि अभिव्यक्ती कौशल्य विकसित होत असल्याचे सांगितले.

# गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात तीन दिवसीय नवरात्रोत्सव उत्साहात

**जळगाव :** गोदावरी फाउंडेशन संचलित गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव येथे तीन दिवसीय नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक वेशभूषा, गरबा-दांडियाचा ताल आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे महाविद्यालय परिसरात चैतन्यमय वातावरण निर्माण झाले होते.

या उत्सवात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. बेस्ट कॉस्च्युम/आउटफिट स्पर्धा,बेस्ट कपल दांडिया स्पर्धा, तर ग्रुप गरबा स्पर्धा घेण्यात आली. यासोबतच गरबा किंग आणि गरबा क्वीन यांचीही निवड करण्यात आली.नवरात्रोत्सवाच्या अंतिम दिवशी गोदावरी फाउंडेशनचे सदस्य आणि प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. अनिकेत पाटील यांच्या हस्ते विविध स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. या स्पर्धांमध्ये बेस्ट कॉस्च्युम/आउटफिट पुरस्कार सानिका कारंडे आणि रोहित पाटील यांनी पटकावला. बेस्ट कपल म्हणून अनुष्का बहिटे आणि सुमित थिगळे यांची निवड झाली, तर ग्रुप गरबा स्पर्धेत एल.वाय. ग्रुपने बाजी मारली. गरबा किंगचा मान वृषभ सुतार याला, तर गरबा क्वीनचा मान अश्विनी ठाकरे हिला मिळाला.

# जिकरा स्कूलच्या विद्यार्थिनींची विज्ञान प्रदर्शनात बाजी!

## तालुकास्तरीय स्पर्धेत इन्शरा शेख व शुमायला शेख यांना प्रथम क्रमांक; जामनेरच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाची भर

**जामनेर :** जामनेर येथे आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२६-२७ मध्ये जिकरा एज्युकेशन सोसायटी संचलित जिकरा इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थिनी इन्शरा इमरान शेख आणि शुमायला शकील शेख यांनी प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आणि विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रत्यय आला असून, दोन्ही विद्यार्थिनींचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

शिक्षण विभाग, पंचायत समिती जामनेर आणि लॉर्ड गणेश इंग्लिश स्कूल, जामनेर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०२६ रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपल्या वैज्ञानिक संकल्पना, प्रयोगशीलता आणि संशोधनवृत्तीचे सादरीकरण केले. या स्पर्धेत जिकरा इंग्लिश मिडियम स्कूलच्या इन्शरा इमरान शेख आणि शुमायला शकील शेख यांनी आपल्या कल्पकतेच्या, वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आणि प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळविला. त्यांच्या या यशाने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन**

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण करणे, संशोधनवृत्ती विकसित करणे, नवनवीन संकल्पनांचा शोध घेणे आणि समस्यांकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता वाढविणे, यासाठी विज्ञान प्रदर्शन



महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरते. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला चालना मिळते, तसेच त्यांच्यात आत्मविश्वास आणि सादरीकरण कौशल्य विकसित होण्यास मदत होते. जिकरा स्कूलच्या विद्यार्थिनींनी मिळविलेले यश हे याच प्रयत्नांचे फलित मानले जात आहे.

**मान्यवरांची उपस्थिती**

या विज्ञान प्रदर्शनाला प्रमुख पाहुणे म्हणून जामनेरचे तहसीलदार नानासाहेब आगळे, माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी कल्पना चौहान, माध्यमिक शिक्षणाधिकारी एजाज शेख, जामनेरचे गटशिक्षणाधिकारी अनिल दळवी, पंचायत समिती जामनेरचे शालेय पोषण आहार अधीक्षक संजय भानुदास पाटील आणि जळगाव डाएटचे प्राचार्य डॉ. अनिल झोपे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

**यशाबद्दल अभिनंदन**

विद्यार्थिनींनी संपादन केलेल्या या यशाबद्दल जिकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष रहीम शेख, सचिव जाकीर शेख, संस्थेचे पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक शादाब सर, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे जिकरा इंग्लिश मिडियम स्कूलच्या शैक्षणिक आणि वैज्ञानिक प्रगतीला नवी दिशा मिळाली असून, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला वाव देण्यासाठी शाळेकडून करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचे कौतुक होत आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर घरपट्टी, नळपट्टी माफ करा ; नगरसेविका माधुरी पाटील यांची मागणी

**मुक्ताईनगर । प्रतिनिधी**

दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या मुक्ताईनगर शहरातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी चालू आर्थिक वर्षाची घरपट्टी, नळपट्टी आणि इतर स्थानिक कर माफ करण्यात यावेत, अशी मागणी नगरसेविका माधुरी सचिन पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी १६ ऑक्टोबर २०२६ रोजी मुक्ताईनगर नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले असून, या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा परिणाम शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक स्थितीवर होत आहे. पावसाअभावी शेतीचे नुकसान झाल्याने अनेक कुटुंबांच्या उत्पन्नावर परिणाम झाला आहे. त्यामुळे दैनंदिन खर्च भागवताना नागरिकांना



आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे नगरसेविका माधुरी पाटील यांनी निवेदनात नमूद केले आहे. अशा परिस्थितीत नागरिकांवर घरपट्टी, नळपट्टी आणि इतर स्थानिक करांचा आर्थिक भार पडत आहे. दुष्काळामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता नागरिकांना करांमधून सवलत देणे आवश्यक असल्याची भूमिका त्यांनी मांडली आहे. मुक्ताईनगर नगरपंचायत हद्दीतील नागरिकांची चालू आर्थिक वर्षाची घरपट्टी, नळपट्टी तसेच इतर लागू असलेले स्थानिक कर पूर्णपणे माफ करण्यासाठी नगरपंचायतीने पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीच्या अनुषंगाने नगरपंचायतीने आवश्यक ठराव मंजूर करून तो शासनाकडे पाठवावा, तसेच नियमानुसार पुढील कार्यवाही करावी, असेही निवेदनात म्हटले आहे. दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना आर्थिक दिलासा मिळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून या प्रश्नाकडे पाहावे, असे आवाहन माधुरी पाटील यांनी केले आहे. नगरसेविका माधुरी सचिन पाटील यांनी हे निवेदन नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना सादर केले असून, याबाबत नगराध्यक्ष संजना पाटील यांच्याकडेही मागणी मांडण्यात आल्याचे दिलेल्या माहितीत नमूद आहे. आता या मागणीवर नगरपंचायत प्रशासन कोणती भूमिका घेते, तसेच घरपट्टी, नळपट्टी आणि इतर स्थानिक करांबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविला जातो का, याकडे मुक्ताईनगरमधील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# फैजपूर शहरात विविध विकाकामांसाठी १० कोटी निधीची आमदारांकडे मागणी

**फैजपूर । प्रतिनिधी**

शहराचा वाढता विस्तार, वाढती लोकसंख्या तसेच नागरिकांच्या मूलभूत सुविधांची गरज लक्षात घेता शहरात विविध विकासकामे करणे अत्यंत आवश्यक आहे. स्थानिक स्तरावर निधीच्या कमतरतेमुळे अनेक कामे प्रलंबित असल्याने विविध विकासकामांसाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी नगराध्यक्ष दामिनी सराफ यांनी आमदार अमोल जावळे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनाची तातडीने दखल घेत आमदार अमोल जावळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे रीतसर पत्र पाठवून निधीची मागणी केली आहे. त्यामुळे शहरातील प्रलंबित विकासकामे लवकरच मार्गी लागतील, असा विश्वास भाजप गटनेते सिद्धेश्वर वाघुळदे यांनी व्यक्त केला. मंत्रालयात आमदार अमोल जावळेसोबत भाजप गटनेते सिद्धेश्वर वाघुळदे, पवन सराफ यांनी निवेदन दिले.

यात गटार बांधकाम २ कोटी, खंडोबा वाडी मार्गावर पथदिवे बसवणे ५० लाख, लोहारा व जलशुद्धीकरण केंद्रात ऑटो जनरेटर खरेदी ३० लाख, स्मशानभूमी विकास खिरोदा रोड व दक्षिण बाहेरपेठ ५० लाख, फळबाजार मार्केट विकसित करणे १ कोटी ८० लाख, बगीचा विकास (खंडोबा वाडी परिसर) आदी कामांचा समावेश आहे.

# मुक्ताईनगरमध्ये कारमधून ३.९५ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त; दोघांवर गुन्हा दाखल

**जळगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात बंदी असतानाही सुरू असलेल्या अवैध गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या तस्करीवर मुक्ताईनगर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. बऱ्हाणपूर-मुक्ताईनगर राष्ट्रीय महामार्गावर एका होंडा सिटी कारमधून तब्बल ३ लाख ९५ हजार ७४० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि वाहन जप्त करण्यात आले

या प्रकरणी गजानन राजेंद्र पाटील (वय २६, रा. मेळसांगवी, ता. मुक्ताईनगर) आणि भारत उत्तम भोई (वय २३, रा. मेंढोळदे, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, १६ ऑक्टोबर २०२६ रोजी बऱ्हाणपूर ते मुक्ताईनगर राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल आरंभसमोर पोलिसांनी सोनरी रंगाच्या होंडा सिटी कारची तपासणी केली. या कारचा क्रमांक एमएच १६ आर ४५७५ असा आहे. तपासणीदरम्यान वाहनामध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळून आला.

कारवाईदरम्यान पोलिसांनी विमल पानमसाल्याची पाकिटे आणि व्ही-१ बिग तंबाखूचा साठा जप्त केला. या प्रतिबंधित पदार्थांची किंमत १ लाख ८० हजार ७४० रुपये असल्याचे नोंदविण्यात आले आहे.प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली २ लाख १५ हजार रुपये किमतीची होंडा सिटी कारही पोलिसांनी जप्त केली. प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ आणि वाहनाची एकत्रित किंमत ३ लाख ९५ हजार ७४० रुपये आहे.अन्न सुरक्षा अधिकारी योगराज किशोर सूर्यवंशी यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यानुसार मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात संबंधित कायद्यांतील तरतुदींनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तुषार सुधाकर पाटील करीत आहेत.

# दिवाळी-छठ पूजेसाठी विशेष रेल्वे गाड्यांची घोषणा; जळगाव, भुसावळला असणार थांबा

**भुसावळ । प्रतिनिधी**

दिवाळी आणि छठ पूजेनिमित्त गावी जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने अमृत भारत विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. हडपसर-मुजफ्फरपूर आणि लोकमान्य टिळक टर्मिनस-अयोध्या कॅन्ट या मार्गावर विशेष गाड्या धावणार आहेत. या गाड्या भुसावळमार्गे धावणार आहेत.

हडपसर-मुजफ्फरपूर मार्गावर दोन साप्ताहिक विशेष गाड्या, तर लोकमान्य टिळक टर्मिनस-अयोध्या कॅन्ट मार्गावर द्वि-साप्ताहिक विशेष गाडी चालविण्यात येणार आहे. हडपसर-मुजफ्फरपूर दरम्यान क्र. ०१४८१/०१४८२ ही साप्ताहिक अमृत भारत विशेष गाडी २० ऑक्टोबर ते २६ नोव्हेंबर या कालावधीत नियोजित



वेळापत्रकानुसार धावेल. हडपसरहून दर मंगळवारी सायंकाळी ७.५५ वाजता सुटणारी ही गाडी गुरुवारी दुपारी १२ वाजता मुजफ्फरपूरला पोहोचेल.

परतीच्या प्रवासात मुजफ्फरपूरहून दर गुरुवारी दुपारी १.१५ वाजता सुटून शनिवारी पहाटे २.४५ वाजता हडपसरला पोहोचेल. तसेच क्र. ०१४५३/०१४५४ ही दुसरी साप्ताहिक विशेष गाडी १९ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान हडपसरहून दर सोमवारी सायंकाळी ७.५५ वाजता सुटून बुधवारी दुपारी १२ वाजता मुजफ्फरपूरला पोहोचेल.

परतीच्या प्रवासात मुजफ्फरपूरहून दर बुधवारी दुपारी १.१५ वाजता सुटून शुक्रवारी पहाटे २.४५ वाजता हडपसरला पोहोचेल. या दोन्ही गाड्यांना दौंड कॉर्ड लाइन, अहिल्यानगर, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, इटारसी, प्रयागराज छिवकी, पाटलीपुत्र यांसह विविध स्थानकांवर थांबे देण्यात आले आहेत लोकमान्य टिळक टर्मिनस-अयोध्या कॅन्ट दरम्यान क्र. ०१०४५/०१०४६ ही द्वि-साप्ताहिक अमृत भारत विशेष गाडी चालविण्यात येणार आहे. १९ ऑक्टोबर ते २८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत या गाडीला भुसावळसह कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, खंडवा आदी ठिकाणी थांबे असतील.

# आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते ग्रामपंचायत इमारत भूमिपूजन व बौद्ध विहाराचे लोकार्पण

**यावल । प्रतिनिधी**

यावल तालुक्यातील किनगाव खुर्द येथे आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते विविध विकासकामांचा भव्य करण्यात आला. गावातील नवीन ग्रामपंचायत इमारतीच्या कामाचे भूमिपूजन, नवनिर्मित बौद्ध विहाराचे लोकार्पण तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे उद्घाटन आमदार सोनवणे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. याप्रसंगी आमदारांनी जिल्हा परिषद उर्दू शाळेला सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला आणि त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

किनगाव खुर्द येथे नवीन सुसज्ज इमारतीसाठी आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या विशेष पुढाकाराने २५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

भूमिपूजनाच्या कार्यक्रमानंतर आमदार प्रा. सोनवणे यांच्या स्थानिक विकास निधीतून तब्बल २० लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या भव्य बौद्ध विहाराचे लोकार्पण करण्यात आले. नव्याने उभारलेल्या या विहाराच्या लोकार्पण प्रसंगी बौद्ध समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बौद्ध विहाराच्या उभारणीमुळे ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करत आमदारांचे आभार मानले.

यासोबतच, किनगाव खुर्द गावात



कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध चौक, मोक्याची ठिकाणे व संवेदनशील परिसरात १२ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या सीसीटीव्ही लोकार्पणही आमदारांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी बाळू पाटील, शांताराम कोळी, रामराव पाटील, संजय महाजन, जगदीश कोळी, संजय कोळी, निळकंठ पाटील, सुरेश तायडे, रवींद्र सपकाळे, नवल कोळी, अशोक कोळी, पिना कोळी, मिलिंद कोळी, रतन वानखेडे, ग्रामसेविका सोनाली सोनवणे, संतोष तायडे, प्रकाश वाणी तसेच उमेद महिला बचत गट व संत महाराज महिला बहुउद्देशीय बचत गटाच्या महिला सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

विकासकामांच्या लोकार्पणानंतर आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांनी गावातील जिल्हा परिषद उर्दू शाळेला अचानक भेट दिली. शाळेत नुकत्याच झालेल्या देखभाल, दुरुस्ती व रंगरंगोटीच्या कामाची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानंतर त्यांनी वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी आपुलकीने हितगुज केले व त्यांच्या शैक्षणिक पाहणी केली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीत कोणतीही अडचण आल्यास ती सोडवण्याला आपण पहिले प्राधान्य देऊ, असा विश्वासही त्यांनी यावेळी दिला. यावल तालुक्यातील किनगाव खुर्द येथे आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते २५ लाखांच्या ग्रामपंचायत इमारतीचे भूमिपूजन, २० लाखांच्या बौद्ध विहाराचे लोकार्पण आणि १२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे उद्घाटन करण्यात आले, तसेच आमदारांनी परिषद शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## महावितरणमध्ये सन्मान सौदामिनींचा

**जळगाव :** स्त्री शक्तीला समर्पित नवरात्र उत्सवानिमित्त मसन्मान सौदामिनींचा हा विशेष कार्यक्रम महावितरणच्या जळगाव परिमंडल कार्यालयात नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात महावितरणमध्ये कार्यरत महिला अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. मुख्य अभियंता आय. ए. मुलाणी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी अधीक्षक अभियंता मदन सांगळे, सहायक महाव्यवस्थापक महेश बुरंगे, व्यवस्थापक तन्वी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महापौरांच्या रुद्रावतार अन् अतिक्रमणधारकाने स्वत:हून काढले शेड

## पत्र्याचे मोठे अतिक्रमण अखेर मोकळे : दीपमाला काळे यांची शहरात पुन्हा धडाकेबाज कारवाई

**जळगाव :** महापौर स्वच्छता संकल्प अभियानांतर्गत सुरू असलेल्या मोहिमेचा प्रत्यय नुकताच आला असून, कानळदा रोडवरील लक्ष्मी नगर परिसरातील नागरिकांना कचऱ्याच्या आणि बेकायदेशीर अतिक्रमणाच्या समस्येपासून मोठा दिलासा मिळाला आहे. महापौर दीपमाला काळे यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे आणि धडाकेबाज भूमिकेमुळे येथील मोकळी जागा व मुख्य हमरस्ता पुन्हा एकदा स्वच्छ आणि मोकळा झाला आहे.

गुरुवारी (दि. १५) महापौर दीपमाला काळे या महापौर स्वच्छता संकल्प अभियानांतर्गत वार्ड क्रमांक एक मधील परिसराची पाहणी करत होत्या. या दरम्यान कानळदा रोडवरील लक्ष्मी नगर भागातील साईबाबा मंदिराच्या जवळील महापालिकेच्या मोकळ्या जागेवर एका व्यक्तीने मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्या व्यक्तीने तिथे पत्र्याचे शेड उभारून मोठ्या प्रमाणावर भंगार सामान व साहित्य जमा केले होते. विशेष म्हणजे, याच शेडच्या बाजूला परिसरातील नागरिकही कचरा टाकत असल्याने या मुख्य हमरस्त्यावरील मोकळ्या जागेवर प्रचंड अस्वच्छता पसरली होती.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत महापौरांनी पाहणीदरम्यानच संबंधित अतिक्रमणधारकाला गुरुवारी कडक शब्दांत तंबी दिली. आजच्या आज तुझे सर्व साहित्य व पत्र्याचे शेड काढून घे, अन्यथा उद्या महापालिकेकडून जेसीबीच्या साहाय्याने हे संपूर्ण अतिक्रमण जमीनदोस्त करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. महापौरांच्या या धडक कारवाईच्या इशाऱ्याचा तात्काळ प्रभाव दिसून आला. दुसऱ्याच दिवशी, शुक्रवारी संबंधित व्यक्तीने स्वत:हून पुढाकार घेत पत्र्याच्या शेडमधील सर्व भंगार साहित्य हलवले आणि जागा पूर्णपणे रिकामी करून दिली.



अतिक्रमण हटवल्यानंतर महापालिकेच्या आरोग्य विभागानेही तातडीने सूत्रे हलवली. जागेवर ताफा आणि वाहने पाठवून संपूर्ण परिसर चोखपणे साफ करण्यात आला, ज्यामुळे वर्षानुवर्षे अस्वच्छतेचा प्रश्न बनलेली ती जागा आता पूर्णपणे स्वच्छ झाली आहे. या मोकळ्या जागेवर तातडीने निर्णय घेऊन महापालिकेची जमीन अतिक्रमणमुक्त केल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी व स्थानिक रहिवाशांनी महापौर दीपमाला काळे यांचे विशेष आभार मानले आहेत.

## प्राध्यापक डॉ. अतुल आनंदराव पाटील यांना पीएचडी



**जळगाव ।** येथील श्री गुलाबराव देवकर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राध्यापक डॉ. अतुल आनंदराव पाटील (मूळचे रेल, तालुका धरणगाव, जळगाव गावचे रहिवासी) यांना फार्मसी शाखेतील फार्मास्युटिकल केमिस्ट्री, या विषयात उच्चस्तरीय संशोधन व अभ्यास पूर्ण केल्याबद्दल पीएचडी पदवी जाहीर झाली आहे. त्यांनी आपले हे संशोधन गंगरार, चित्तोडगड (राजस्थान) येथील प्रसिद्ध मेवाड युनिव्हर्सिटीमधून पूर्ण केले.

## डॉ. गुणवंतराव सरोदे आयुर्वेद महाविद्यालयात ॲनाटॉमी डे

**जळगाव ।** गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. गुनवंतराव सरोदे आयुर्वेद मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, जळगाव येथे ॠॲनाटॉमी डेफ उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. वैभव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. विविध शैक्षणिक आणि सर्जनशील उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शरीररचनाशास्त्रातील ज्ञानाचे प्रभावी सादरीकरण केले.

शरीररचनाशास्त्र हा वैद्यकीय शिक्षणाचा महत्त्वपूर्ण पाया आहे. या विषयाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, अभ्यासातील संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून स्पष्ट व्हाव्यात आणि विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या



निमित्ताने ॲनाटॉमी मॉडेल्स, बॉडी पेंटिंग, पीपीटी प्रेझेंटेशन आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मानवी शरीराची रचना, विविध अवयवांची वैशिष्ट्ये आणि त्यांची कार्यपद्धती विविध माध्यमांतून सादर केली. वैज्ञानिक माहितीची सांगड कलात्मकतेशी घालत विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचे आणि कल्पकतेचे दर्शन घडविले.

गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, डॉ. वैभव पाटील आणि डॉ. अनिकेत पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमांचे कौतुक केले. अशा शैक्षणिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान अधिक समृद्ध करावे आणि वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करावी, असे प्रोत्साहन त्यांनी दिले. शरीररचनाशास्त्र विभागप्रमुख डॉ. उमाकांत चौधरी आणि डॉ. मयुरी चौधरी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना मार्गदर्शन केले. अशा उपक्रमांमुळे विषयाची सखोल समज विकसित होण्यासोबतच विद्यार्थ्यांची निरीक्षणशक्ती, सर्जनशीलता आणि सादरीकरण कौशल्ये वृद्धिंगत होतात, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# गुलाबराव देवकर फार्मसी कॉलेजची लेह-लडाख अभ्यासू सहल

## कारगिल व छत्रपती शिवाजी महाराज स्मारकास अभिवादन

**जळगाव :** येथील श्रीकृष्णा शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ संचलित गुलाबराव देवकर फार्मसी कॉलेजतर्फे २४ सप्टेंबर रोजी लेह-लडाख येथे भव्य शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या अभ्यासू वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी देण्यासाठी महाविद्यालयाने या सहलीसाठी २ लाख रुपयांचा विशेष निधी उपलब्ध करून दिला होता.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी लेह-लडाखमधील निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद लुटण्यासोबतच अनेक ऐतिहासिक व राष्ट्रप्रेरणादायी ठिकाणांना भेट दिली. विद्यार्थ्यांनी १९९९ च्या कारगिल युद्धातील अमर जवानांच्या स्मृतीस उजाळा देणाऱ्या कारगिल युद्धाच्या स्मारकास भेट देऊन देशरक्षकांसाठी भावपूर्ण अभिवादन केले. याशिवाय, लडाख प्रदेशातील सर्वात उंच छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारकास भेट देऊन शिवछत्रपतींच्या चरणी माथा टेकवून वंदन केले.

विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सांस्कृतिक जागरूकता आणि भौगोलिक ज्ञान वाढीस लागावे या उद्देशाने आयोजित या सहलीत एकूण ४० विद्यार्थी अत्यंत उत्साहाने सहभागी झाले होते. या संपूर्ण सहलीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीचे महत्त्व पटवून देत प्रवासादरम्यान आवश्यक काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले.



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयातर्फे दरवर्षी अशा विविध शैक्षणिक सहलींचे आयोजन केले जाते. या उपक्रमांसाठी संस्थेचे चेअरमन गुलाबराव देवकर तसेच विशाल देवकर आणि आणि प्रफुल्ल देवकर यांचे नेहमीच मोलाचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभत असते. सहल यशस्वीपणे पार पडल्याबद्दल प्राध्यापकवृंद, विद्यार्थी व पालकांकडून संस्थेचे आणि प्राचार्यांचे आभार व्यक्त केले जात असून सर्वत्र कौतुक होत आहे.